MANGO RESEARCH SUB CENTRE RAMESHWAR, Po. Vijaydurg,
Tal. Deogad, Dist. Sindhudurg

www.dbskkv.org

आंबा संशोधन उपकेंद्र
रामेश्वर, पो. विजयदुर्ग,
ता.देवगड, जि. सिंधुदुर्ग

Mobile : 9370975818 mrscrameshwar@gmail.com भ्रमणध्वनी : ९३७०९७५८१८

जा.क्र./आंसउके/आस्था/४२३/२०२३ दिनांक ०७/११/२०२३

प्रति,

मा. प्रभारी अधिकारी,
कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ. बा. सा. कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली,
जि. रत्नागिरी.

**विषयः—पहारेकरी पदाच्या सेवा कंत्राटी पध्दतीने प्राप्त करण्यासाठीचे दरपत्रक मागणीपत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत....**

संदर्भः—जा.क्र./आसउकें/रामेश्वर/४२१/२०२३, दिनांक ०७/११/२०२३

महोदय,

उपरोक्त सदंर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर, पो. विजयदुर्ग, ता. देवगड जि. सिंधुदुर्ग येथेपहारेकरी पदाच्या सेवा कंत्राटी पध्दतीने प्राप्त करण्यासाठीचे दरपत्रक मागणीपत्र सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. तरी सदर पत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू

सोबत : वरीलप्रमाणे

(signature) ७.११.२३

(व्ही. पी. दामोधर)
**प्रभारी अधिकारी,**
आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर,
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.

MANGO RESEARCH SUB CENTRE
RAMESHWAR, Po. Vijaydurg,
Tal. Deogad, Dist. Sindhudurg
Mobile : 9370975818

www.dbskkv.org
mrscrameshwar@gmail.com

आंबा संशोधन उपकेंद्र
रामेश्वर, पो. विजयदुर्ग,
ता.देवगड, जि. सिंधुदुर्ग
भ्रमणध्वनी ९३७०९७५८१८

जा.क्र. आंसंऊके/रामेश्वर/दरपत्रक/ 421 /२०२३ दिनांक : 09/11/2023

प्रति,

..........................
..........................
..........................
..........................

**विषय:** आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वरच्या प्रक्षेत्रावर सुरक्षारक्षक पुरविण्यासाठी दरपत्रक पाठविणेबाबत....

महाशय,

आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर, पो.विजयदुर्ग ता.देवगड,जि.सिंधुदुर्ग या कार्यालयाच्या प्रक्षेत्रावर आंब्याची व्यापारी तत्वावर लागवड केलेली आहे. तसेच ड्रगन फ्रूट फळपिकाची लागवड केलेली आहे. याशिवाय रोपवाटिका, भांडाराची इमारत व कार्यालयाची इमारत आहे. या सर्व मालमत्तेची दिवस व रात्र सुरक्षा करणेसाठी 03 (तिन) सुरक्षा रक्षकांची माहे डिसेंबर 2023 ते मार्च 2023 असे चार महिन्याकरिता ठेकेदारी तत्वावर नेमण्याचे आहेत. तरी सदरचे सुरक्षा रक्षक आपण काय दराने पुरवू शकाल. याबाबतचे दरपत्रक या कार्यालयास दिनांक २२/११/२०२३ पर्यंत पोहचेल अशा रितिने सिलबंद लखोट्यात निम्नस्वाक्षरीकार यांचे नावे पाठवावे.

सुरक्षा रक्षक पुरविण्याबाबतच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहे.

१. सुरक्षा रक्षकाच्या कामाचा दर 8 तासाकरिता प्रतिदिन देण्यात येईल.
२. सुरक्षा रक्षकाचे वेतन अदायकीसाठी प्रत्येक महिन्यानंतर निम्नस्वाक्षरीकारयांच्याकडे देयक द्यावयाचे आहे.
३. प्रत्येक सुरक्षा रक्षकाने नेमून दिलेल्या कामाच्यावेळी वेळेत हजर राहणे आवश्यक आहे.
४. प्रत्येक सुरक्षा रक्षकाच्या कामामध्ये त्यांच्या अधिपत्याखालील प्रक्षेत्रावर चोरी किंवा नुकसान झाल्यास त्या सुरक्षा रक्षकास जबाबदार धरण्यात येईल. व त्याच्या देयकामधून किंवा सुरक्षा अनामत रक्कमेतून संबधित नुकसान भरपाई वसूल करण्यात येईल.
५. प्रक्षेत्रावर सुरक्षा रक्षकाकडुन कामचुकारपणा आढळल्यास ठेकेदाराचा ठेका रद्द करण्यात येईल.
६. प्रक्षेत्रावर राखण करण्यासाठी लागणारी बॅटरी व सेल कंत्राटदाराने स्वत: पुरविणेच आहेत.
७. प्रत्येक सुरक्षा रक्षकाने कर्तव्य बजाविण्यापूर्वी नोंदणी वहीत हजेरी लावावी व पूर्वी कर्तव्यावर असणाऱ्या सुरक्षा रक्षकाकडून प्रक्षेत्र, इमारतीची पहाणी करूनच ताब्यात घ्यावे.
८. काही अपरिहार्य कारणामुळे कामावर हजार राहता येणार नसेल तर त्याबाबत आगाऊ सूचना देणे आवश्यक आहे. तसेच त्यासाठी पर्यायी व्यवस्था ठेकेदारांनी स्वत: करावयाची आहे.
९. आपणास सुरक्षा रक्षकाचे कंत्राटी काम मिळाल्यास विद्यापीठाने कायमस्वरूपी नोकरी मिळणेबाबत आपणास कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही.

आपला विश्वासू

उद्यानविद्यावेत्ता
आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर
ता. देवगड, जि सिंधुदुर्ग